मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३१९ वा • शनिवार, ता. ३१ मे २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## वैष्णवी हगवणे केस : वकिलांचे वर्तन ॲडव्होकेट्स कायद्याचे उल्लंघन करणारे– चाकणकर

### अधिवक्त्यांसाठी स्पष्ट नियमावली ठरविण्याच्या सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

वैष्णवी हगवणे प्रकरणाच्या आरोपींच्या वकिलांचे वर्तन ॲडव्होकेट्स कायदा, १९६१ मधील तरतुदींना छेद देणारे असल्याचे मत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपालीताई चाकणकर यांनी व्यक्त केले आहे. चाकणकर यांनी स्पष्ट केले की, अतिशय संवेदनशील अशा घटनांमध्ये वकिलांनी सार्वजनिक माध्यमांत व्यक्त होताना अधिक जबाबदारीने आणि संयमाने वागणे आवश्यक आहे. या अनुषंगाने राज्य महिला आयोगाने बार कौन्सिलच्या सचिवांना पत्र पाठवून याबाबत गांभीर्याने विचार करण्याची विनंती केली, तसेच अधिवक्त्यांसाठी स्पष्ट नियमावली ठरविण्याच्या सूचना दिल्या आहेत. या प्रकरणाच्या सामाजिक आणि न्यायसंस्थेवरील परिणामाचा विचार करता, वकिलांचे सार्वजनिक विधान हे पीडित कुटुंबाच्या भावनांना धक्का पोहोचवणारे ठरू शकते. त्यामुळे वकिलांनी माध्यमांशी संवाद साधताना योग्य आचारसंहितेचे पालन करावे, असा आग्रह चाकणकर यांनी धरला आहे. राज्य महिला आयोग या संपूर्ण घटनेचा बारकाईने आढावा घेत असून भविष्यकाळात अशा घटनांत वकिलांचे वर्तन नियमन करण्यासाठी ठोस मार्गदर्शक तत्त्वे आखण्यात यावीत, अशी अपेक्षा चाकणकर यांनी व्यक्त केली आहे.



## महिला आयोग आपल्या दारी उपक्रमांतर्गत चाकणकर यांची जनसुनावणी

### महिला सुरक्षेसाठी ठोस पावले

**नाशिक । प्रतिनिधी**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी आज नाशिकमध्ये महिला आयोग आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जनसुनावणी घेतली. या उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी महिलांवरील अत्याचार, तक्रारींची नोंद, आणि पीडित महिलांना मानसिक, वैद्यकीय व कायदेशीर मदत यासंबंधी सविस्तर चर्चा केली. चाकणकर यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी केवळ चर्चा न करता ठोस निर्णय घेण्याचा आग्रह धरला आणि महिलांसाठी एक सुरक्षित व सशक्त पर्यावरण तयार करण्याच्या उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले. या जनसुनावणीत महिलांनी आपल्या तक्रारी मांडल्या, ज्यावर चाकणकर यांनी त्वरित कारवाईचे आश्वासन दिले. त्यांनी सांगितले की, ''महिलांच्या बाजूने कायदा आहे.

मात्र, त्यातून पळवाट काढली जाते. तक्रारीचे निवारण करण्यासाठी पॅनल तयार करण्यात आले आहे. महिलांच्या तक्रारीची दखल पोलीस आणि इतर कोणत्याही यंत्रणांनी घेतली नाही तर शेवटी महिला आयोग आहे.'' चाकणकर यांनी महिलांना धैर्य व आत्मविश्वास देण्याचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, ''महिलांची सुरक्षा ही आपली सामाजिक जबाबदारी आहे.

आपण सर्वांनी एकत्र येऊन महिला सन्मान व सुरक्षेसाठी उभे राहिले पाहिजे.'' या उपक्रमामुळे नाशिक शहरातील महिला सुरक्षेच्या उपाययोजनांना नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# पं.अजित कडकडे गोमंत विभूषण

## गोवा ३९ वा घटकराज्य दिन उत्साहात साजरा





**पणजी । प्रतिनिधी**

गोवा सरकार राज्याचा वारसा, संस्कृती सांभाळत विकास कामे करत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी केले. शुक्रवारी पणजीत राज्याचा ३९ व्या घटक राज्य दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मंत्री, आमदार, सचिव व खात्याचे संचालक उपस्थित होते.

यावेळी राजभाषा पुरस्कार, आयकॉनिक ब्रँड ऑफ गोवा पुरस्कारांचे वितरण झाले. स्वातंत्र्य सैनिकांच्या १६ मुलांना तसेच अनुकंपा तत्त्वावर ३१ जणांना नियुक्ती पत्रे देण्यात आली. तत्पूर्वी केंद्रीय शिक्षण खात्याच्या संयुक्त सचिव अर्चना अवस्थी यांनी गोवा १०० टक्के साक्षर झाल्याचे जाहीर केले. मुख्यमंत्री म्हणाले की, भाजपच्या डबल इंजिन सरकारमुळे गोव्यात विकास कामे दुप्पट वेगाने होत आहेत. राज्यात ५० वर्षात झाला नाही तेवढा मागील १० वर्षात विकास झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या सहकार्यामुळे आम्ही पेडणेपासून काणकोण पर्यंत पायाभूत सुविधा तयार करू शकलो. यामुळेच गोवा सर्व बाबतीत देशातील आघाडीचे राज्य ठरले आहे. गोव्याने केंद्र सरकारच्या १३ फ्लॅगशिप उपक्रमांपैकी ८० टक्के उपक्रम पूर्णत्वास नेले आहेत. गोव्याची ओळख सन सँड आणि सी अशी आहे. आम्ही त्यामध्ये आता स्पिरीच्युअलिटीचा नवीन एस जोडला आहे.

राज्यात मंदिरांच्या पर्यटनात वाढ होत आहे. ते म्हणाले, राज्य सरकारतर्फे ३५ व्या घटक राज्य दिनापासून राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय पातळीवर वेगळी ओळख मिळवलेल्या गोमंतकीय ब्रँड्सना सन्मानित करण्यात येणार आहे. यंदा बिग फूट, पॉल जॉन, कॅफे तातो, गोमंत विद्या निकेतन, डांगी ऑप्टिशियन, मावझो स्टुडिओ, क्लब टिटो, ग्रासियस हॉस्पिटल आणि कलाकार सागर नाईक मुळे यांना सन्मानित करण्यात आले. गोव्याचे नाव उज्वल करणाऱ्या ब्रँडला पुढील वर्षीपासून दरवर्षी सन्मानित करण्यात येईल. राजभाषा पुरस्कारच्या माध्यमातून कोकणी, मराठी साहित्यिकांना सन्मानित करण्यात आले. यंदा संस्कृत साहित्यासाठी पुरस्कार दिला नसला तरी पुढील वर्षी संबंधित साहित्यिकांनी अर्ज करावेत, असेही ते म्हणाले. सरकारने गोवा मुक्तीसंग्रामात लढा दिलेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांसाठी योजना आणली आहे. त्यानुसार आज स्वातंत्र्य सैनिकांच्या १६ मुलांना नोकरीचे नेमणूक पत्र देण्यात आले आहे. त्यांनी आपल्या आई-वडिलांप्रमाणे गोव्याची सेवा करणे अपेक्षित आहे. सरकारी नोकरीत अपघाती मृत्यू पावलेल्यांच्या मुलांना अनुकंपा तत्त्वावर नोकरी देण्यात येते. यानुसार आज ३१ जणांना नियुक्तीपत्र देण्यात आले आहे. पुढील पिढ्यांना गोव्याचा वारसा इतिहास समजावा यासाठी आज पुस्तकांचे तसेच ॲनिमेशन सिरीजचे अनावरण करण्यात आले. या सिरिजचा पहिला भाग १९ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांनी म्हणाले की, यंदाचा गोमंत विभूषण पुरस्कार पं. अजित कडकडे यांना देण्यात येणार येणार आहे. कडकडे सध्या मुंबईत स्थायिक असले तरी ते आजही आपण गोमंतकीय असल्याचे अभिमानाने सांगतात केंद्राच्या उल्लास योजने अंतर्गत गोवा १०० टक्के साक्षर राज्य झाले आहे. २०२३-२४ मध्ये गोव्यातील साक्षरता ९३.६ टक्के होती. आता ती वाढून १०० टक्के झाल्याचे केंद्रीय शिक्षण खात्याच्या संयुक्त सचिव अर्चना अवस्थी यांनी सांगितले.



गोवा राज्याच्या मूळ लोकसंस्कृतीचे संगीत व लोककलेच्या माध्यमातून उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल राज्यपाल तथा राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. राजभवन येथे गोवा राज्य स्थापना दिवस (३० मे) तसेच तेलंगणा राज्य स्थापना दिवस (२ जून) संयुक्तरित्या साजरा करण्यात आला. प्रत्येकाने आपल्या राज्याचा, धर्माचा व आपल्या भाषेच्या अभिमानाबरोबरच सर्वाधिक अभिमान मातृभूमीचा बाळगला पाहिजे, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.

## जनक हगवणे यांची काळजी घेण्यासाठी स्वाती कसपटे यांची 'फिट पर्सन' म्हणून नियुक्ती

**मुंबई । प्रतिनिधी**

पुण्यातील वैष्णवी हगवणे यांच्या निधनानंतर, बाल कल्याण समितीने त्यांच्या ९ महिन्यांचा मुलगा जनक हगवणे यांची काळजी घेण्यासाठी त्यांची आजी स्वाती आनंद कसपटे यांना ''फिट पर्सन'' म्हणून नियुक्त केले आहे. जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या सामाजिक तपासणी अहवालानुसार स्वाती कसपटे या यासाठी एक योग्य व्यक्ती असल्याचे आढळून आले आहे. त्यांचे सामाजिक, भावनिक आणि कौटुंबिक वातावरण मुलाच्या कल्याणासाठी अनुकूल असल्याचे मानले जाते. यापुढे, दिवंगत वैष्णवी हगवणे यांचा मुलगा जनक हगवणे यांचा कायदेशीर ताबा स्वाती आनंद कसपटे यांच्याकडे असेल. त्याच्या शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासाची पूर्णपणे जबाबदारी स्वाती यांच्यावर असेल अशी माहिती महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

**अखेर कारवाई**

**हगवणे बंधूना खोट्या कागदपत्रांच्या आधारे शस्त्र परवाना देणाऱ्या, कैद्यांना द्यायच्या साहित्यात कथित ५०० कोटींच्या घोटाळा केल्याचा आरोप असलेले विशेष पोलीस महानिरीक्षक, कारागृह व सुधारसेवा जालींदर सुपेकर यांची पद अवनत करून तडकाफडकी बदली.**

## संसदरत्न पुरस्कार : कार्यक्षम खासदारांचा गौरव की प्रतिमा चमकविण्याचा प्रयत्न?

भारतीय लोकशाहीचा कणा म्हणजे संसद. येथे देशभरातून निवडून आलेले खासदार विविध मुद्द्यांवर चर्चा करतात, प्रश्न उपस्थित करतात, आणि कायदे मांडतात. संसदेतील कामगिरी ही जनतेच्या अपेक्षांवर आधारित असते. याच कामगिरीचा आढावा घेऊन काही खासदारांना ''संसदरत्न पुरस्कार'' देण्यात येतो. पण याविषयी अनेक समज-गैरसमज आहेत. या पुरस्कारामागील मूळ उद्देश काय आहे? सरकारचा यात काही संबंध आहे का? आणि पुरस्कार मिळाल्याने एखाद्या खासदाराची गुणवत्ता सिद्ध होते का? हे सारे प्रश्न विचारण्यासारखे आहेत.



**भैरवनाथ वाकळे**
संपादक, रयत समाचार
९४०५४०१८००

**समाजहित**

संसदरत्न पुरस्कार म्हणजे काय? संसदेत चांगली कामगिरी करणाऱ्या खासदारांना गौरवण्यासाठी २०१० साली या चेन्नईतील खाजगी संस्थेने संसदरत्न पुरस्काराची सुरुवात केली. या संस्थेचे संस्थापक आणि मुख्य प्रवर्तक के. श्रीनिवासन असून या उपक्रमाची संकल्पना माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रेरणेतून साकारली गेली. या पुरस्काराचा उद्देश संसदेत कार्यक्षमतेने काम करणाऱ्या खासदारांना प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या चांगल्या कामगिरीची नोंद जनतेपुढे मांडणे हा आहे. पुरस्कारासाठी कोणत्याही खासदाराचे राजकीय पक्ष, जाती, धर्म वा प्रादेशिक ओळख विचारात घेतली जात नाही. मुख्यत्वे लोकसभा आणि राज्यसभा सदस्यांची संसदीय कामगिरी जसे की विचारलेले प्रश्न, चर्चांमध्ये सहभाग, सादर केलेली खासगी विधेयके, समित्यांमधील सक्रियता यावर आधारित मूल्यांकन केले जाते. पुरस्कार देणारी संस्था आणि सरकारचा सहभाग संसदरत्न पुरस्कार ही खासगी संस्था देत असल्यामुळे भारत सरकारचा यामध्ये थेट सहभाग नाही. हे कोणतेही शासकीय किंवा संसद सचिवालयाने मंजूर केलेले सन्मानपत्र नाही. सरकार किंवा संसदेच्या मान्यतेशिवाय दिला गेलेला पुरस्कार म्हणून याला ''अनौपचारिक'' सन्मान मानले जाते. मात्र, पुरस्कार देताना संस्थेचे प्रतिनिधी आणि काही ज्येष्ठ माजी खासदार, प्रशासकीय अधिकारी आणि अभ्यासक समिती सदस्य म्हणून काम करतात. हे मूल्यांकन PRS Legislative Research, Lok Sabha/ Rajya Sabha Website यासारख्या अधिकृत स्त्रोतांतील माहितीवर आधारित असते, त्यामुळे पारदर्शकता राखली जाते, असा संस्थेचा दावा आहे. पुरस्काराची विश्वासार्हता आणि मर्यादा अनेकदा हा प्रश्न उपस्थित होतो की, या पुरस्कारामुळे खासदाराची ''बुद्धिमत्ता'' किंवा ''जनतेसाठीचा खरा कामकाज'' सिद्ध होतो का? याचे उत्तर थोडक्यात ''नाही'' असेच आहे. कारण संसदीय कामगिरीचा अर्थ केवळ आकडेवारी नव्हे. एखाद्याने १०० प्रश्न विचारले, याचा अर्थ ते सर्व प्रश्न मुद्देसूद आणि जनतेसाठी उपयुक्त होते, असे म्हणता येत नाही. एखादा खासदार शांतपणे काम करतो पण मतदारसंघात अथवा समित्यांमध्ये चांगले कार्य करत असतो अशा कामगिरीचा यात थेट उल्लेख होत नाही.पुरस्काराची निवड प्रक्रिया ही मुख्यतः माहितीच्या विशिष्ट संख्यात्मक (quantitative) निकषांवर आधारित असते, त्यामुळे गुणवत्ता (quality) मोजली जात नाही. समाजातील धारणा सामान्यतः असा समज आहे की संसदरत्न पुरस्कार मिळाला म्हणजे त्या खासदाराची बुद्धिमत्ता, कर्तृत्व, आणि देशभक्ती सिद्ध झाली. पण ही धारणा अर्धवट आहे. हा पुरस्कार चांगली संसदीय उपस्थिती, सक्रियता यासाठी दिला जातो. तो ''देशासाठी सर्वोच्च योगदान'' किंवा ''जनतेच्या कामात सर्वश्रेष्ठ'' अशा संज्ञांनी मोजता येत नाही. संसदरत्न पुरस्कार हा एक प्रेरणादायी उपक्रम आहे. संसदीय लोकशाहीमध्ये खासदारांची जबाबदारी आणि पारदर्शकता वाढावी यासाठी अशा पुरस्कारांची गरज आहे. मात्र, या पुरस्काराला अधिकृत सरकारी मान्यता नाही हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. तसेच, हा पुरस्कार मिळाला म्हणून एखादा खासदार इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे, असा एकांगी निष्कर्ष काढणे योग्य नाही. वाचकांनीही अशा पुरस्कारांकडे जागरूकतेने आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहावे. पुरस्कार हा एक पैलू असतो, पण खरा न्याय मतदारांच्या अनुभवातून आणि जनतेच्या सेवेतूनच मिळतो.

## डॉ. कल्याणी बडे यांना भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट प्रदान

### एमर्जिंग अचिव्हर्स अवॉर्ड कौन्सिलकडून गौरव

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगरच्या नामवंत ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ डॉ. कल्याणी रुशिकेश बडे यांना एमर्जिंग अचिव्हर्स अवॉर्ड कौन्सिलच्या वतीने भ्रूणतज्ज्ञ क्षेत्रातील डॉक्टरेट पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया, नवी दिल्ली येथे झालेल्या या सन्मान सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते डॉ. बडे यांना गौरविण्यात आले. यावेळी डॉ. कल्याणी बडे यांनी हा पुरस्कार माझ्या आयुष्यातील सर्व पाठिंबा देणाऱ्या व्यक्तींचा आहे. माझी आई सरोजिनी नागरगोजे आणि वडील डॉ. प्रल्हाद नागरगोजे यांनी दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल त्यांचे मी मनापासून आभार मानते. माझे पती रुशिकेश बडे आणि माझा मुलगा अवनीश बडे यांची मोठी साथ लाभली. मोठी बहीण डॉ. स्वप्नाली आणि भाची आस्था यांनी नेहमीच प्रेरणा दिली आहे. त्यांच्या प्रेमामुळे आणि पाठिंब्यामुळेच मी या टप्प्यावर पोहोचले आहे. तसेच, माझे मित्र परिवार आणि सहकारी यांनी प्रत्येक क्षणी माझा विश्वास वाढवला असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. डॉ. कल्याणी बडे यांनी न्यू आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथून जैवतंत्रज्ञानात पदवी आणि पदव्युत्तर पदवी प्राप्त केली आहे. सध्या त्या अपोलो फर्टिलिटी सेंटर, मुंबई येथे ज्येष्ठ भ्रूणतज्ज्ञ म्हणून कार्यरत आहेत आणि वंध्यत्व उपचाराच्या क्षेत्रात त्यांचे योगदान अत्यंत उल्लेखनीय आहे. डॉ. कल्याणी बडे यांचा प्रवास हा



ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी आणि महिलांसाठी विशेषतः आरोग्य व विज्ञान क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतो. छोट्या गावातून पुढे येऊन राष्ट्रीय स्तरावर पुरस्काररुपाने बहुमान मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



**मराठमोळ्या अविनाश साबळेने रचला इतिहास.**

**आशियाई क्रीडा स्पर्धेत ३६ वर्षानंतर महाराष्ट्रातील अविनाश साबळे याने स्टीपलचेस स्पर्धेत सुवर्णपदक पटकावत क्रीडजागतात एक सोनेरी पण जोडले**

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा उत्साहात

## सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचा उपक्रम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट, नगर चॅप्टरच्या वतीने नुकत्याच पार पडलेल्या पंधरवडामीटिंगमध्ये इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत यश मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. उद्योजकांच्या विकासासाठी आणि नव्या पिढीला दिशा देण्याच्या उद्देशाने काम करणाऱ्या या ट्रस्टच्या वतीने गुणवंतांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टचे चेअरमन अजित पवार, सेक्रेटरी नंदेश शिंदे, खजिनदार सचिन शिरसाठ, नगर चॅप्टरचे सर्व सदस्य, क्रॉस चॅप्टरचचे सदस्य, शहरातील उद्योजक व पुणे येथील व्यावसायिक प्रशिक्षक उपस्थित होते. चेअरमन अजित पवार म्हणाले की, दहावी व बारावी ही विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाची पायरी असून, त्यात मिळवलेले यश म्हणजे त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा मजबूत



पाया आहे. या यशातून विद्यार्थ्यांनी अधिक प्रेरणा घेत सातत्याने पुढे वाटचाल करावी. त्यांनी जिद्द, चिकाटी आणि मेहनतीचे महत्त्व स्पष्ट करुन विद्यार्थ्यांना भविष्यात योग्य दिशा निवडण्याचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उद्योजकांच्या पाल्य असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार पालकांसह करण्यात आला. सत्कारमूर्तींमध्ये पायल धनंजय पवार, अंजली राठोड, पीयुष गुंडू, सर्वेश तवले, ऐश्वर्या ठाणगे, दिव्या राणे, आणि आर्चित कदम यांचा समावेश होता. त्यांच्या पालकांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा पार पडला. यावेळी पालकांच्या वतीने ॲड. तवले यांनी ट्रस्टच्या कार्यपद्धतीचे कौतुक करत आभार मानले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देणारे असे उपक्रम समाजाला दिशा देतात, असे ते म्हणाले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उद्योजक सचिन राणे, हॉटेल सुवर्णम प्राईडचे महेश धुमाळ आणि तोडमल क्लासेसचे अक्षय तोडमल यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदेश शिंदे यांनी केले, तर आभार ट्रस्टचे खजिनदार सचिन शिरसाठ यांनी मानले. सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्ट द्वारे उद्योजकांच्या उन्नतीसाठी चालविलेल्या चळवळीमध्ये मध्ये सहभागी होण्यासाठी या ९२७१७१०८९२ क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# मुसळधार पावसाने झालेल्या नुकसानीची उपायुक्तांनी केली पाहणी

**अहमदनगर । प्रतिनिधी**

नुकतेच झालेल्या मुसळधार पावसाने केडगावमध्ये पूर सदृश्य परिस्थिती निर्माण होवून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. झालेल्या नुकसानीची मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे व माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी पहाणी केली. मुसळधार पावसामुळे केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे केडगावमध्ये राहत असणाऱ्या काही नागरिकांच्या घरात देखील पाणी शिरले. केडगाव अमरधामची संरक्षण भिंत देखील पावसाने वाहून गेली. देवी रोड वरील आंबेडकर भवनाची भिंतही कोसळली. कांबळे मळा येथील पूल वाहून गेला आहे. झालेल्या नुकसानीची पहाणी करुन तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीकोनाने माजी नगरसेवक मनोज कोतकर यांनी मनपा उपायुक्त विजयकुमार मुंडे यांच्याशी संपर्क साधून त्यांना पाहणी करण्यासाठी बोलावून घेतले. यावेळी नुकसान झालेल्या भागाची पाहणी करण्यात आली. मनोज कोतकर यांनी मुसळधार पावसाने केडगावमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मनपा प्रशासनाच्या माध्यमातून तातडीने समस्या सोडविण्यासाठी व उपाययोजना करण्यासंदर्भात पाठपुरावा सुरु आहे. लवकरच मान्सून सक्रीय होणार असून, भविष्यातील संकट ओळखून उपाययोजना कराव्या. लवकरच अमरधामची भिंत बांधली जाणार असून, नागरिकांनी देखील घाबरुन न जाता, मनपा प्रशासन त्यांच्या पाठिशी असल्याचे भावना व्यक्त केली. तर नागरिकांना देखील नुकसान भरपाई मिळण्याची मागणी त्यांनी केली. उपायुक्त मुंडे यांनी झालेल्या नुकसानी संदर्भात तातडीने ठोस पाऊले उचलून उपाययोजना केल्या जाणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी शरद ठुबे, सुमित लोंढे, सोनु बापू घेबूड, बाला कोतकर, ऋषी गवळी, शुभम लोंढे, भाऊ गुंड आदी उपस्थित होते.



मनपा हद्दीतील गोविंदपुरा नाका ते डॉ.धाराणी चौक रस्त्याची दुर्दशा; प्रशासकीय कारभाराने नागरिक हतबल; तात्काळ दुरूस्तीची गरज. (छायाचित्र : एक्स्प्रेस फोटो)

# दोन दशकापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्वसामान्यांसाठी ठरतोय आरोग्यदूत- डॉ. मुनोत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मागील दोन दशकापासून आनंदऋषीजी हॉस्पिटल सर्वसामान्यांसाठी आरोग्यदूत ठरला आहे. खर्चिक व अद्ययावत सर्व आरोग्य सुविधा सर्वसामान्यांना एकाच छताखाली उपलब्ध झाली आहे. १०० बेड पासून दुमजली इमारतीपासून सुरू झालेला हा प्रवास बहुमजली इमारतीसह दुपटीने बेडची संख्या आणि अद्ययावत ऑपरेशन थिएटरद्वारे सर्वसामान्यांना आरोग्य सेवा दिली जात असल्याचे प्रतिपादन जनरल सर्जन डॉ. प्रवीण मुनोत यांनी केले. जैन सोशल फेडरेशन संचलित श्री आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये आयोजित जनरल शस्त्रक्रिया शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी हॉस्पिटलच्या स्थापनेपासून सेवा देणारे डॉ. मुनोत बोलत होते. याप्रसंगी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. वसंत कटारिया, अभय गुगळे, मानकचंद कटारिया, वसंत चोपडा, डॉ. आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, डॉ. विवेक भापकर आदी उपस्थित होते. पुढे डॉ. मुनोत म्हणाले की, आनंदऋषीजीचे ऑपरेशन थिएटर प्रशस्त, सुसज्ज व अद्यावत असून, एकाच वेळी ५ ऑपरेशन होऊ शकतात. यामध्ये हृदयरोग वेगळे असून, एन्जोप्लास्टीसाठी वेगळी कॅथलॅब उपलब्ध करण्यात आलेली आहे. दर महिन्याला मोठ्या प्रमाणात यशस्वी शस्त्रक्रिया होत असल्याचे स्पष्ट करुन, त्यांनी हॉस्पिटल स्थापनेपासूनचा सुसज्ज हॉस्पिटल पर्यंतचा अनुभव विशद केला. प्रास्ताविकात डॉ. प्रकाश कांकरिया म्हणाले की, शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहचविण्यासाठी दर महिन्याला दोन शिबिर घेण्यात येत आहे. स्थापनेपासून काही तज्ञ डॉक्टर या रुग्णसेवेशी जोडले गेले असून, त्यांचा प्रदीर्घ अनुभव रुग्णांना फायदेशीर ठरत आहे. अद्ययावत आरोग्य सुविधा, कमी खर्चात शस्त्रक्रिया व तज्ञ डॉक्टर रुग्णांना नवजीवन देण्याचे काम करत असल्याचे त्यांनी सांगितले.

# विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंगवर कारवाई करा



**अहमदनगर । प्रतिनिधी**

शहरात मोठ्या प्रमाणात असलेल्या विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंगवर कारवाई करावी व एकाच ठिकाणी १० वर्षापासून कार्यरत असलेल्या ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील कर्मचाऱ्यांची बदली करण्याच्या मागणीसाठी सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालया समोर शुक्रवारी ता.३० मे रोजी उपोषण करण्यात आले. या उपोषणात छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे, जिल्हाध्यक्ष विनोद साळवे, जिल्हा सचिव हजरत शेख, धडक जनरल कामगार संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्रीधर शेलार, शाहीर कान्हू सुंबे, संदीप गायकवाड, दत्ता वामन, दीपक वर्मा, सुभाष काकडे, सुखदेव पवार आदी उपस्थित होते. नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. महापालिका हद्दीत अनेक ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच ५७ महाराष्ट्र बटालियन एनसीसी अहिल्यानगर येथील ज्या कर्मचाऱ्यांना बदलीचा कालावधी पूर्ण झालेला असून, ते मागील दहा वर्षापासून त्याच ठिकाणी काम करत आहे. वेळोवेळी उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचलनालय यांच्याशी पत्रव्यवहार व पाठपुरावा करून प्रतिसाद मिळालेला नाही. सदर प्रकरणी तक्रारीची चौकशी करुन, त्या चौकशीचा केवल फार्स करण्यात आला आहे. चौकशी अहवाल अद्याप तक्रारदार यांना देण्यात आलेला नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. १०-१० वर्षे सलग एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची जिल्हा बाहेर बदली करावी, त्यांची खातेनिहाय चौकशी करावी, २०१५-१६ मधील बोगस भरती प्रकरणी ज्या कर्मचाऱ्यांचे नावे एफआयर मध्ये आहेत त्या सर्व कर्मचाऱ्यांची सेवा पुस्तीकेत गुन्ह्यांची नोंद तात्काळ करण्यात यावी, वरिष्ठ लिपिक व त्यांची पत्नी दोन्हीही शासनाचे नियम डावलून एचआरए भत्ता घेत असून, त्याची देखील चौकशी करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

# योग प्रशिक्षक पावडे व बेलसरे योगासन पंच परीक्षा उत्तीर्ण



**अहमदनगर । प्रतिनिधी**

बृहन महाराष्ट्र योग परिषद व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ (अमरावती) यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या योगासन या क्रीडा प्रकाराच्या पंच परीक्षेत शहरातील श्री रामावतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट संचलित एम.एम. वाय.टी.सी. क्लबचे योग प्रशिक्षक अक्षय पावडे व पुनम बेलसरे हे उत्तीर्ण झाले. चिखलदरा येथे सदर योगासन पंच परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. दोन्ही प्रशिक्षक गेल्या दोन वर्षापासून शालेय विद्यार्थ्यांना योगासनाचे प्रशिक्षण देण्याचे कार्य करत आहेत. त्यांच्या माध्यमातून योगाचा प्रचार प्रसार सुरु आहे.

प्रशिक्षकांनी मिळवलेल्या यशाबद्दल ट्रस्टचे विश्वस्त मोहन मानधना यांनी अभिनंदन केले. क्लबचे प्रशिक्षक उमेश झोटिंग, प्रणिता तरोटे, आप्पा लाढाणे, अक्षता गुंड यांच्या मार्गदर्शनाखाली पावडे व बेलसरे प्रशिक्षणाचे कार्य करत आहे. त्यांच्या या यशाबद्दल क्लबच्या सर्व खेळाडूंनी तसेच पालकांनी देखील अभिनंदन केले आहे.

# आजारांची संख्या वाढत असताना मोफत शिबिरांची आवश्यकता- डॉ. पटेल

## अहमदनगर शहर स्थापना दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिर

**अहमदनगर । आबीद खान**

देशात गरजूंची संख्या मोठी आहे. त्या प्रमाणात सामाजिक उपक्रमांची कमतरता आहे. आपल्याकडे रोज काही ना काही दिवस साजरे केले जातात. अशावेळी समाजाच्या गरजा ओळखून त्या दिवसांना ते गरजूंना गरज असलेले उपक्रम राबविले पाहिजेत. असे प्रतिपादन पटेल स्पेशालिटी क्लिनिकचे डॉ. अशपाक पटेल यांनी केले.

पटेल स्पेशालिटी क्लिनिक व अलकरम हॉस्पिटल तर्फे अहमदनगर शहराच्या स्थापना दिनानिमित्त मोफत युरिक एसिड



तपासणी, सर्वरोग तपासणी, डोळे तपासणी सहुलतीत रक्त लघवी तपासणी, एक्स-रे, सोनोग्राफी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी डॉ. अशपाक पटेल, डॉ जहीर मुजावर, मखदूम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, अल करम सोसायटीचे तौफिक तांबोली, शेरअली शेख आदी उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ पटेल म्हणाले की संपूर्ण जगात भारतच एकमेव असा देश आहे जिथे वेगवेगळ्या धर्माचे लोक गुण्यागोविंदाने एकत्र राहतात. हाच या देशाचा खरा गौरव असून, याच ओळखीने भारत अखख्या जगात ओळखला जातो.

अशा देशात रोज काही न काही सण उत्सव साजरे करताना समाजाच्या हिताचे उपक्रम राबविल्यास गरजूंच्या गरजांना हातभार लागेल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आबीद खान यांनी केले. सुत्रसंचालन शेरअली शेख यांनी केले. तर आभार तौफिक तांबोली यांनी मानले.


रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल

आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

**भाड्याने देणे**

परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.

- संपर्क -

८८८८३४७४११

निसार Art

सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट

7020356335 | 9860830016

पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

मे. रुपाली एजन्सी

फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स

राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.

(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०

ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!

कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द

जगदंबा टी सेंटर

चहा, कॉफी, लेमन टी

शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर

शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर

प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे

97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा


हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

रयत समाचार

शनिवार, ता. ३१ मे २०२५





# शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप

**पारनेर । प्रतिनिधी**

महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख तथा स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांच्या देखरेखीखाली नवी दिल्ली येथील भारतीय कृषि अनुसंधान परिषद व कृषि अभियांत्रिकी विभाग, महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत असलेल्या कन्सोरशिया रिसर्च प्रोजेक्ट, आयओटी सक्षम व सेंसर आधारीत अद्ययावत सिंचन व्यवस्थापन प्रणाली प्रकल्पांतर्गत कृषि साहित्यवाटप कार्यक्रमाचे आयोजन मौजे कासारे, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर येथे करण्यात आले होते. याप्रसंगी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पाचे सहप्रमुख संशोधक डॉ. प्रमोद पोपळे, कासारे गावचे सरपंच शिवाजी निमसे, संशोधन सहयोगी डॉ. शुभांगी घाडगे, वरिष्ठ संशोधन सहकारी इंजि. शुभम सुपेकर आणि इंजि. गणेश उपस्थित होते. यावेळी स्मार्ट इरिगेशन प्रकल्पांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेच्या माध्यमातून कासारे गावातील १९ शेतकऱ्यांना कृषि साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये कृषि अवजारे, जैविक खते, जैविक औषधे व कृषिदर्शनी-२०२५ या साहित्याचा समावेश होता. याप्रसंगी डॉ. प्रमोद पोपळे यांनी प्रकल्पाविषयी सविस्तर माहिती देऊन शेतीसाठी उपयुक्त आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती दिली. यावेळी त्यांनी भूगर्भातील पाणीसाठा वाढवण्यासाठी फायदेशीर ठरणाऱ्या विविध पद्धतींची आणि मृदा व जलसंधारण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व स्वागत शिवाजी निमसे यांनी केले.

# भरवस्तीत वळूंची झुंज



**पाथर्डी । नितीन गटाणी**

शहरातील मध्यवर्ती व वर्दळीच्या ठिकाणी असलेल्या गांधी चौक येथे भल्या सकाळीच वळूंची झुंज सुरू झाल्यानंतर मोठा गोंधळ उडाला. यात अभिजीत गुजर हा तरुण गंभीररित्या जखमी झाला असून, अहमदनगर येथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. तरी नगर परिषदेने तातडीने वळूंची धरपकड मोहीम राबवावी अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा येथील त्रस्त नागरिकांनी दिला आहे.

शहर परिसरामध्ये बाहेरील गावातून अनेक वळू आणून सोडल्याने शहर परिसरातील नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो. यापूर्वी अपवादात्मक दिसणारे वळू आता शहराच्या प्रत्येक भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहेत.दिवसेंदिवस वळूच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्यामुळे अचानकपने वळुंची झुंज कुठेही व केव्हाही सुरू होते. विशेषत: गजबजलेल्या भागांमध्ये वळूंची झुंज सुरू झाल्यानंतर नागरिकात एकच घबराट निर्माण होते व त्या भागात अघोषित संचारबंदी सारखे परिस्थिती निर्माण होते.कधी-कधी तर दोन-दोन तास ही झुंज सुरू असते.यामुळे अनेकांना आपल्या वाहतुकीचा मार्ग बदलावा लागतो.तर झुंज सुटल्यानंतर वळू उधळतच पळत असल्याने नागरिक देखील जखमी होण्याचे प्रमाण वाढले आहे.

## तरुण गंभीर जखमी

यासह दुचाकी-चार चाकी वाहनांचे देखील मोठे नुकसान होत आहे.वळूंची झुंज लागताच पालिका प्रशासनाने तातडीने झुंज सोडवण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. काल सकाळी शहरातील मध्यवस्तीत असणाऱ्या गांधी चौक येथे सकाळी सातलाच वळूंची झुंज सुरू झाली. तब्बल दीड तास ही झुंज सुरू होती.यादरम्यान पूर्णपणे वाहतूक ठप्प झाली होती.यातील एका वळूने माघार घेत अचानकच धूम ठोकल्याने एकच गोंधळ उडाला.या गोंधळात उधळलेल्या वळूची अभिजीत गुजर या युवकाला जोरदार धडक बसली. यामुळे गुजर हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. दरम्यान शहरभर मोकाट फिरणाऱ्या वळूंची धरपकड मोहीम सुरू करून नगर परिषदेच्या कोंडवाड्यात ठेवण्याची अथवा गो शाळेत सोडण्याची मागणी नागरिकाकडून होत आहे.

### मोकाट वळूंना तातडीने पकडावे

गेल्या काही महिन्यापासून शहरवासीय नागरिक व परिसरातील शेतकऱ्यांना मोठा त्रास होत असून याचा मोठा फटका मलादेखील बसला आहे.मी मागील दोन दिवसापासून अहिल्यानगर येथे उपचार घेत असून मोठी शस्त्रक्रिया देखील माझ्यावर झाली आहे.याची दखल नगर परिषदेने तात्काळ व गांभीर्याने घ्यावी.

**अभिजीत गुजर,** जखमी तरुण

### वाळूंना पकडण्याची मोहीम चालू करू

वाळूंच्या वाढत्या समस्या व तक्रारी लक्षात घेऊन नगरपरिषदेने स्वमालकीचा सुमारे तीन लाख रुपये किमतीचा पिंजरा विकत घेतला आहे.पुढील चार दिवसांमध्ये हा पिंजरा शहरात दाखल होत असून यानंतर तातडीने वळूंना पकडण्याची मोहीम सुरू होईल.व पकडलेल्या सर्व मुलांना गो शाळेत सोडण्यात येईल असे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी सांगितले.

**संतोष लांडगे,** मुख्याधिकारी



# अध्यात्मिक बैठकीतून समाधान लाभते- विशाल सोळंकी

**पाथर्डी । नितीन गटाणी**

वयाच्या २३ व्या वर्षी संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा(युपीएससी) उत्तीर्ण होत लगेचच आसाम राज्यातील जोर्हाट येथे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती, यानंतर २० वर्ष विविध उच्चस्तरीय सनदी अधिकारी पदावर कार्यरत राहून मनोभावे समाज व पर्यायाने देशसेवा केल्यानंतर वयाच्या ४२ व्या वर्षी म्हणजे २०२५ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली. असे सासवड येथील रहिवासी विशाल सोळंकी यांनी आज शहरातील दक्षिण मुखी विजय हनुमान मंदिर येथे भेट देऊन दर्शन घेतले. सोळंकी हे सध्या तीन दिवस अहिल्यानगर जिल्ह्याच्या धार्मिक पर्यटन दौऱ्यावर आहेत. पाथर्डी तालुक्यातील व परिसरातील श्री क्षेत्र मोहटादेवी, मढी, वृद्धेश्वर, मायंबा, तारकेश्वर गड आदी धार्मिक स्थळांना भेटी देत शहराच्या कसबा विभागातील दक्षिण मुखी विजय हनुमान मंदिर येथे सोळंकी यांनी भेट दिली.

यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर, अधिव्याख्याता विकास गरड, हभप भागीरथी बाबा, आरपीआयचे सुरेश भागवत, अजय साठे, अमोल केरकळ, गणेश नांगरे आदी उपस्थित होते. अनेक युवक-युवतींचे स्वप्न उच्च अधिकारी होण्याचे असते. यासाठी अनेक वर्ष तन-मन धनाने ते सातत्याने प्रयत्नशील देखील असतात.बहुतांशी विद्यार्थ्यांना तर अनेक वेळा अपयश पचवावे लागते. तेव्हा त्यातील काहींना यश पदरी पडते. अशा परिस्थितीमध्ये अवघ्या २३ व्या वर्षी सोळंकी हे संघ लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होत आसाम येथील सेवेनंतर महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त,यशदाचे अतिरिक्त महासंचालक आदी उच्च पदावर वीस वर्ष काम केले.मात्र वयाच्या अवघ्या ४२ व्या वर्षी नवी वाट स्वीकारल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. यावेळी बोलताना सोळंकी म्हणाले की, आध्यात्मिक अधिष्ठान असेल तर व्यवहारिक जीवनात यशस्वी होण्यापासून कोणीही रोखू शकत नाही. मी सध्या वेगळ्या प्रकल्पावर काम करत आहे. योग्य वेळी माझी योजना जाहीर करील असे ते सांगतात. असे असले तरी देखील एवढ्या मोठ्या पदाचा त्याग करून सोळंकी यांनी आखलेली नवी दिशा सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

# चक्क उन्हाळ्यात मे महिन्यात नांदणी नदी दुथडी भरून वाहिली

## चाळीस-पन्नास वर्षांतील पहिला अनुभव



**जामखेड । रिजवान शेख**

तालुक्यातील जवळा गावातील नांदणी नदीने यावर्षी एक ऐतिहासिक दृश्य निर्माण केले. मे महिन्यात सलग आठ-दहा दिवस सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नांदणी नदी पहिल्यांदाच दुथडी भरून वाहत असल्याचे पाहायला मिळाले. गावातील नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गेल्या चाळीस ते पन्नास वर्षांच्या इतिहासात उन्हाळ्यात विशेषतः मे महिन्यात अशा प्रकारे नदीत पाणी वाहिल्याचे दृश्य यापूर्वी कधीच पाहायला मिळाले नव्हते. या अनपेक्षित पावसामुळे संपूर्ण परिसरात उत्सुकता वाढली असून लहानथोर सर्वजण नदी पाहण्यासाठी जमा झाले. नद्यांप्रमाणेच परिसरातील नालेही भरून वाहू लागले आहेत. मागील वर्षी कमी पावसामुळे बरेचसे विहिरी आणि बोअरवेल्स कोरडे पडले होते. त्यामुळे फळपीक उत्पादक व ऊस शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला होता. यंदा मात्र अवकाळी पावसाने संपूर्ण चित्रच पालटले. शेतकऱ्यांनी कष्टाने उभे केलेली उन्हाळी पिके, आणि साठवलेले धान्य या पावसामुळे भिजले. अनेक घरांमध्येही पाणी शिरल्यामुळे नुकसान झाले. परिणामी जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. काही भागांत पशुधनही गमवावे लागले. उन्हाळ्यातील मे महिन्यात इतका पाऊस पूर्वी कधीही न झाल्याचे स्थानिक बुजुर्ग व्यक्ती सांगतात. अवकाळीमुळे वीज कोसळण्याच्या घटनाही घडल्या असून मृत्यूची नोंद आहे. परिसरातील नागरिक आणि शेतकऱ्यांनी शासनाकडे नुकसानग्रस्त भागांची तात्काळ पाहणी करून पंचनामे करण्याची आणि नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याची मागणी केली आहे.



# २५ वर्षांनी रंगला आठवणींचा सोहळा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

कालचा वर्ग, आजचा परिवार! अशी भावना मनात साठवत, वांगदरी विद्यालयाच्या इयत्ता दहावी २००१ च्या बॅचचा स्नेहमेळावा तब्बल पंचवीस वर्षांनंतर उत्साहात आणि भावनांनी भारलेल्या वातावरणात पार पडला. ता. २५ मे रोजी यवत जवळील निसर्गरम्य 'मेहेर रिट्रीट ॲग्रो टुरिझम' या ठिकाणी जुन्या मित्र-मैत्रिणींचा पुन्हा एकत्र येण्याचा सोहळा रंगला. जवळपास ३६ माजी विद्यार्थी, ज्यात २१ मुले व १५ मुली सहभागी झाल्या होत्या, त्यांनी आपली व्यस्त जीवनरेषा थांबवून या खास क्षणासाठी उपस्थिती लावली. अवकाळी पावसाच्या सरी पडत असतानाही जुन्या मित्रांना भेटण्याच्या ओढीपोटी कोणाच्याच पायांना लगाम लागला नाही. या स्नेहमेळाव्याचे संयोजन गणेश नागवडे, अविनाश जगताप, संतोष सोनवणे, गीतांजली पवार आणि कविता गायकवाड या माजी विद्यार्थ्यांनी हिरीरीने केले. त्यांनी आठवणींच्या या गोफात प्रेमाचे धागे मिसळत मनमिळावूपणाचा झंकार घडवून आणला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस सर्व उपस्थितांनी आपापला पंचवीस वर्षांचा जीवनप्रवास थोडक्यात कथन करत अनुभवांची शिदोरी उलगडली. शालेय आठवणी, बालमित्रांच्या गमतीजमती, शिक्षकांचे मार्गदर्शन यांचे सूर जणू पुन्हा एकदा हृदयात गुंजले. गप्पागोष्टी, फोटोसेशन्स आणि हास्यविनोदांनी दिवस कसा गेला ते कळलेही नाही! या स्नेहमेळाव्यास नितीन पवार, शिवाजी चोरमले, वैशाली नागवडे, रेखा नागवडे, वृषाली नागवडे, जयश्री लगड, अनिल जानकर, काका घाडगे, सचिन जाधव, कीर्ती राऊत, अश्विनी सोनवणे, बापू महानोर, भूषण गायकवाड, छाया बडे, धनंजय कोरडकर, जालिंदर काळे, बाळू महानोर, किरण जाधव, मोहन भिसे, पल्लवी दरेकर, पाराजी सरक, रफिक सय्यद, राहुल इथापे, सदा महानोर, संतोष जाधव, सीमा गोरे, सुनीता सुत्तेकर, रूपाली खंडागळे यांसह अनेक माजी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. अशा या स्नेहमेळाव्याने सर्वांच्या मनात नात्यांची उब पुन्हा जागवली, आणि जुने दिवस नव्याने अनुभवण्याचा एक अविस्मरणीय क्षण देऊन गेला अशी भावना प्रत्येक माजी विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण जाधव यांनी केले तर कार्यक्रमाची सांगता करताना, गणेश नागवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले आणि पुढील स्नेहमेळाव्यासाठी अधिक उत्साहाने एकत्र येण्याचे आवाहन केले.

# एकनाथ शिंदे यांच्या हाती नरकातला स्वर्ग

**मुंबई । तुषार सोनवणे**

शिवसेना खासदार संजय राऊत यांनी लिहिलेल्या 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकाने वाचकांमध्ये प्रचंड लोकप्रियता मिळवली आहे. अलीकडेच या पुस्तकाचा दिमाखदार प्रकाशन सोहळा पार पडला, ज्याला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार आणि प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या पुस्तकाने राजकीय वर्तुळातही खळबळ उडवली आहे.संजय राऊत यांनी आपल्या राजकीय सहकारी आणि मित्रांना हे पुस्तक भेट म्हणून पाठवले आहे.




यामध्ये विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, त्यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना फोडणारे नेते एकनाथ शिंदे यांनाही या पुस्तकाच्या प्रती पाठवल्या आहेत. राऊत यांनी आपल्या सोशल मीडियावर याबाबत माहिती देताना लिहिले, ''माझे एकेकाळचे मित्र आणि शिवसेनेतील सहकारी एकनाथ शिंदे यांना 'नरकातला स्वर्ग' या पुस्तकाची प्रत पाठवली आहे. शिंदे आणि सुरत-गौहाटीला गेलेल्या त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी हे पुस्तक जरूर वाचावे. जय महाराष्ट्र!''राऊत यांच्या या कृतीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले असून, अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. या पुस्तकात शिवसेनेच्या राजकीय प्रवासासह अनेक संवेदनशील मुद्द्यांचा समावेश असल्याचे बोलले जात आहे. एकनाथ शिंदे यांच्या बंडखोरीनंतर शिवसेनेत निर्माण झालेल्या पडद्यामागील घडामोडींचा उलगडा या पुस्तकात होण्याची शक्यता आहे, ज्यामुळे हे पुस्तक राजकीयदृष्ट्या अधिक चर्चेत आले आहे.या पुस्तकाच्या प्रकाशनाने आणि राऊत यांच्या सोशल मीडिया पोस्टने महाराष्ट्राच्या राजकारणात नव्या वादाला तोंड फोडले आहे. शिंदे गटाकडून यावर काय प्रतिक्रिया येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चौकशीचे आदेश

**कोपरगाव । किसन पवार**

कोपरगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये होत असलेल्या कथित बोगस आणि भ्रष्ट कारभाराची चौकशी करण्याचे आदेश विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी दिले आहेत.

कोपरगाव बाजार समितीच्या सचिवावर करण्यात आलेल्या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर त्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून स्वतंत्र चौकशी करण्यासाठी अधिकृत चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली. विभागीय सहनिबंधक संभाजी निकम यांच्या आदेशानुसार, संबंधित तक्रारींमध्ये नमूद मुद्द्यांवर महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३, नियम १९६७ तसेच बाजार समितीच्या मंजूर उपविधी आणि इतर संबंधित कायद्यांनुसार सखोल व मुद्देनिहाय चौकशी करण्याचे आदेश दिले गेले आहेत. विजय जाधव, यांनी ता. २३ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या अर्जामध्ये सचिव यांनी बाजार समितीच्या व्यवहारात भ्रष्टाचार केल्याचा आरोप केला आहे. अर्जदाराने यापूर्वीही सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कोपरगाव तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्याकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कारवाई न झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. त्यांच्या अर्जात नमूद केले आहे की, सचिव यांचे जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सखोल संबंध असल्यामुळे त्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे जिल्ह्याबाहेरील त्रिसदस्यीय किंवा पाच सदस्यीय स्वतंत्र समितीमार्फत सखोल चौकशी व्हावी अशी मागणी त्यांनी केली होती.अर्जात असेही नमूद आहे की, जर या प्रकरणाची १५ दिवसांत चौकशी झाली नाही, तर अर्जदार आत्मदहनाचा मार्ग अवलंबतील. त्यामुळे परिस्थितीची गांभीर्य ओळखून,




विभागीय सहनिबंधकांनी तातडीने निर्णय घेत सचिव यांच्यावरील चौकशीसाठी अधिकृत चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे. या अधिकाऱ्यांनी चौकशीचे वस्तुनिष्ठ व कार्यसुझक अहवाल १५ दिवसांच्या आत सादर करावा, असे आदेश देण्यात आले आहेत.यामुळे कोपरगाव तालुक्यात खळबळ उडाली असून बाजार समितीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुढील तपास आणि चौकशी अहवालावर सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

आज ३१ मे, आज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती. ३०० वर्षापूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे ३१ मे १७२५ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील चोंडी या गावी माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दाम्पत्यापोटी अहिल्यादेविंचा जन्म झाला. अतिशय छोट्या आणि सामान्य कुटूंबात जन्मलेल्या अहिल्यादेवी यांनी इतिहासात मानाचे स्थान प्राप्त केले आहे. ज्या काळात स्त्रियांना शिक्षणास बंदी होती, चूल आणि मूल हेच स्त्रियांचे जीवन होते, स्त्रियांनी घराचा उंबरठा ओलांडणे म्हणजे पाप समजले जात त्याकाळात त्यांच्या वडिलांनी त्यांना लिहायला, वाचायला शिकवले. मराठ्यांच्या इतिहासातील पराक्रमी समजल्या जाणाऱ्या होळकर घराण्यातील सुभेदार खंडेराव होळकर यांच्याशी वयाच्या आठव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. खंडेरावांपासून त्यांना मालेराव आणि मुक्ताबाई अशी दोन अपत्ये झाली. पण वयाच्या अवघ्या २८ व्या वर्षी त्यांना वैधव्यास सामोरे जावे लागले. पती खंडेराव हे कुंभेरीच्या लढाईत धारातीर्थी पडल्यावर त्यावेळच्या सनातनी लोकांनी त्यांच्यावर सती जाण्यासाठी दबाव आणला पण सासरे सरदार मल्हारराव होळकर यांनी या अमानवी, सनातनी परंपरेला विरोध करून अहिल्यादेवींना सती जाण्यापासून परावृत्त केले. आपल्या सासऱ्यांच्या इच्छेनुसार त्यांनी सती जाण्याचा विचार सोडून दिला. अहिल्यादेवींची राजकीय कारकीर्द तेंव्हापासूनच सुरू झाली. खंडेरावांची जागा अहील्यादेवींनी घेतली. मल्हारराव देशभर मोहिमांवर व्यस्त असत त्यावेळी मल्हारराव आणि अहिल्यादेवींमध्ये पत्रव्यवहार होत. सासरा - सुनेमधील पत्रव्यवहार हा अहिल्यादेवींच्या राजकीय विचारकतेचा उत्कृष्ट नमुना होय. मोहीमेवर असताना मल्हारराव प्रजा रक्षणाच्या सूचना अहिल्यादेवींना जसे देताना दिसतात तसेच अहिल्यादेवी आपल्या सासऱ्यांना देताना दिसतात. सासरा सुनेचे ऐकल असा तो काळ नव्हता....आता ही नाही...पण मल्हाररावांसारखा मुत्सद्दी अहिल्यादेवींचा सल्ला अंमलात आणत यावरुनच अहिल्यादेवींची योग्यता लक्षात येते. मल्हारराव मोहिमेवर असत तेंव्हा स्वतः अहिल्यादेवी राज्याचा बंदोबस्त चोख राखीत. मल्हाररावांच्या सूचनेप्रमाणे त्या कारभार करीत. १७६६ साली मल्हाररावांचे वृद्धापकाळाने निधन झाले. दरम्यानच्या काळात अहिल्यादेवींनी स्त्रियांना लष्करी प्रशिक्षण देणारे महाविद्यालय सुरू केले. ज्या काळात स्त्रियांना घराबाहेर पडायला बंदी होती त्याकाळात त्यांनी स्वतःची ५०० महिलांची पलटण उभी केली. अहिल्यादेवींचे प्रशासन ब्रिटिशांनाही आदर्शभूत ठरले. सर्व देशात जेंव्हा दांडगाईचे राज्य होते, कोणाचा कोणाला पायपोस नव्हता त्याकाळात सुरळीत चालणारे एकमेव राज्य म्हणजे अहिल्यादेवींचे राज्य. अहिल्यादेवी या दानशूर, कर्तृत्वत्वान, धर्मपारायण व कार्यक्षम राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जात असल्या तरी त्यांची राज्यकारभारावर प्रशासकीय पकड घट्ट होती. त्यांच्या वडिलांनी लहानपणी दिलेल्या शिकवणुकीचा आणि सासरे मल्हारराव यांनी दिलेल्या राजकीय कारभाराच्या तालमीचा त्यांना उपयोग झाला. त्या सामान्य कुटुंबातील असल्यामुळे त्यांना प्रजेच्या अडीअडचणीची जाणीव होती. त्यांचे राहणे अतिशय साधे व



सात्विक होते म्हणूनच त्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर असे नाव पडले. अहिल्यादेवींनी देशभर भ्रमंती केली. देशभ्रमण करताना तिर्थक्षेत्रांच्या जागी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शेकडो मंदिरांचा जिर्णोद्धार केला. जवळपास २८ वर्ष त्यांनी राज्यकारभाराचा गाडा सैन्याच्या सहकार्याने अतिशय कुशलपणे चालवला. कोणतेही कर्ज न काढता राज्याची तिजोरी भक्कम करून त्यांनी प्रजाहिताकडे लक्ष दिले. आदर्श राज्यकारभार कसा करावा याचा वस्तुपाठच अहिल्यादेवींनी घालून दिला. अहिल्यादेवी होळकर हे नाव इतिहासात अमर झाले. बाई काय राज्यकारभार करणार ही सनातनी अटकळ त्यांनी खोटी ठरवली. १३ ऑगस्ट १७९५ रोजी अहिल्यादेवींचे निधन झाले. प्रजाहितदक्ष, आदर्श राजकर्ती म्हणून इतिहासात अजरामर झालेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# के.जे. सोमैया महाविद्यालयाच्या मानसी पांडेची तैवान आंतरराष्ट्रीय इंटर्नशिपसाठी निवड

## एकूण ३० विद्यार्थ्यांना देशभरातील नामांकित कंपन्यांमध्ये संधी

**कोपरगाव । किसन पवार**

के.जे. सोमैया वरिष्ठ व के.बी. रोहमारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या संगणक विज्ञान शाखेतील कु. मानसी अरविंद पांडे हिची तैवान येथील सी.सी.यू. आंतरराष्ट्रीय इंटर्नशिप कार्यक्रमासाठी जुलै ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत निवड झाली असून, ही महाविद्यालयासाठी अत्यंत गौरवाची बाब आहे. याचबरोबर, महाविद्यालयातील विविध शाखांमधील एकूण ३० विद्यार्थ्यांची हैदराबाद, पुणे व नाशिक येथील नामांकित कंपन्यांमध्ये नोकरी व प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी दिली. या यशाबाबत अधिक माहिती देताना ट्रेनिंग अँड




प्लेसमेंट सेलचे प्रमुख डॉ. संजय अरगडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांची निवड झालेल्या प्रमुख कंपन्यांमध्ये हेट्रो फार्मासिटिकल लिमिटेड (हैदराबाद), किरण अ‍ॅकॅडमी (पुणे), टेक्नोग्रोथ सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रा. लि. (पुणे) आणि समर्थ फाउंडेशन (नाशिक) यांचा समावेश आहे.'' विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे महाविद्यालयाच्या ३७१ विद्यार्थ्यांची महाज्योती शिष्यवृत्तीसाठी, तसेच इतर ३९ विद्यार्थ्यांची अन्य शिष्यवृत्त्यांसाठी निवड झाल्यामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कोपरगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अशोक रोहमारे, सचिव अ‍ॅड. संजीव कुलकर्णी, विश्वस्त संदीप रोहमारे, प्राचार्य डॉ. विजय ठाणगे, रजिस्ट्रार डॉ. अभिजीत नाईकवाडे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामागे डॉ. वसुदेव साळुंके, डॉ. रवींद्र जाधव, डॉ. निलेश पोटे यांचे मार्गदर्शन लाभले असून, प्रा. विजय सोमासे, प्रा. अजित धनवटे, प्रा. सुनील गुंजाळ आणि प्रा. स्वागत रणधीर या प्राध्यापकांनी प्लेसमेंट कॅम्पसाठी विशेष परिश्रम घेतले.

# मुख्याध्यापक, प्राचार्य,शाळा महाविद्यालयाचे अध्यक्ष, पालक यांना आवाहन

३१ मे हा तंबाखूविरोधी दिन पाळला जातो.सरकारने नुकताच शाळेजवळ / महाविद्यालयाजवळ तंबाखुजन्य टपरी नसावी असा शासननिर्णय निर्गमित केला. आता या महत्वाच्या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी मुख्याध्यापक, प्राचार्य,शाळा समितीचे अध्यक्ष,संस्थाचालक,पालक यांनी पुढाकार घ्यायला हवा. अन्यथा हा महत्वाचा निर्णय केवळ कागदावर राहील. त्यासाठी दुकानदारांशी वाद न घालता तंबाखूविरोधी दिनाचे औचित्य म्हणून शाळेच्या वतीने सर्वांनी एकत्र येऊन महापालिका, नगरपालिका, ग्रामपंचाय, पोलिस, तहसीलदार यांना निवेदन द्यावे व शाळेबाहेरचे व परिसरातील अशा टपऱ्या, दुकानांचे अतिक्रमण काढावे अशी मागणी करावी. त्यांनी प्रतिसाद न दिल्यास आमदार किंवा प्रमुख राजकीय नेते,पत्रकार यांना सांगावे.. एकदा अतिक्रमण काढल्यावर पुन्हा होणार नाही याची काळजी शाळेने घ्यावी. आज दुकानात एनर्जी ड्रिंक मिळतात.ती अत्यंत घातक आहेत.शाळेजवळच्या दुकानात ती ड्रिंक नसावीत याचाही निवेदनात उल्लेख करावा व शाळेजवळच्या दुकानात अशी ड्रिंक विकली जाणार नाही अशी समज दुकानांना द्यावी प्रसंगी तक्रार करावी. पालकांना वर्षाच्या सुरुवातीला स्पष्ट सांगावे की विद्यार्थ्यांना पैसे देऊ नका.. त्याऐवजी विद्यार्थ्यांना बचत करायला शिकवावे असे सांगावे.शाळेत तशी बँक करावी. पालकांनी पैसे दिले तर तंबाखूजन्य पदार्थ,एनर्जी ड्रिंक हा धोका वाढतो म्हणून पालकांनी विद्यार्थ्यांना पैसे देऊ नका यासाठी सातत्याने सांगत राहावे. अधूनमधून विद्यार्थी दप्तरांची तपासणी करावी.त्यात आक्षेपार्ह पदार्थ किंवा पैसे सापडले तर पालकांना अवगत करावे. पुढील पिढी व्यसनमुक्त राहण्यासाठी आपण सर्वांनी जो पुढाकार घ्यावा ही कळकळीची प्रार्थना लक्षात घ्या.कृती केली तरच बदल घडणार आहे.



**हेरंब कुलकर्णी**
८२०८५८९१९५

**शिक्षणवार्ता**

# प्रा. जवाहर मुथा यांना जर्नालिस्ट कौंसिल ऑफ इंडियाचा पुरस्कार



**अहमदनगर । प्रतिनिधी**

३० मे हा दिवस हिंदी पत्रकार दिन म्हणून भारतात ओळखला जातो. जर्नलिस्ट कौन्सिल ऑफ इंडिया (नोंदणीकृत) या अखिल भारतीय पत्रकार परिषदेने प्रा. जवाहर मुथा यांना या वर्षी डिजिटल प्रमाणपत्र देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला. प्रा.मुथा यांनी महाराष्ट्र हिंदी पत्रकार संघटना १९९५ मध्ये स्थापन केली होती. त्या संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी दहा वर्षे कार्य केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठात ते संशोधन संपादक होते. कृषी पत्रकारितेचा अभ्यास क्रम त्यांनी आपल्या सेवेच्या काळात सुरू केला होता. किर्लोस्कर मासिकांचे ते सहसंपादक होते. इल्नाचे(इंडियन लॅग्वेजेस न्यूज पेपर्स असोसिएशन) जनरल सेक्रेटरी ते होते.त्याशिवाय ज्योतिष पत्रिका, साप्ताहिक नगर संकेत, मिलिंद, या वृत्तपत्रांना स्थापन करून त्यांनी मार्गदर्शन केले आहे. दै. केसरी चे वार्ताहर म्हणून ही त्यांनी कार्य केले आहे. आज ही वयाच्या ८५ व्या वयात ते लेखन कार्य करीत असतात. पुणे विद्यापीठात त्यांच्या पत्रकारिता व साहित्यविषयक कार्यावर संशोधन ही झाले आहे. महाराष्ट्र पत्रकार कल्याण निधीने त्यांना बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार देऊन गौरवले आहे. जर्नालिस्ट कौंसिल ऑफ इंडिया या संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.अनुराग सक्सेना यांनी ३० मे २०२५ रोजी हिंदी पत्रकारिता दिनानिमित्त प्रा. जवाहर मुथा यांना डिजिटल प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप; श्रीरामपूर जैन संघाचा उपक्रम

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघाच्यावतीने या शैक्षणिकवर्षी आदिवासी भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी त्यांची शैक्षणिक परिस्थिती उंचावण्यासाठी वह्या, पाट्या आणि शिष्यवृत्ती पुस्तके असे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार असून ज्यांच्या कोणाकडे जूने शैक्षणिक साहित्य असेल त्यांनी श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघ कार्यालयात जमा करावे असे आवाहन श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघाचे अध्यक्ष रमेश लोढा यांनी केले आहे. येथील श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघाच्यावतीने जिल्ह्यातील अतीदुर्गम अकोले सारख्या आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी जे शैक्षणिक साहित्य आवश्यक होते ते देण्यासाठी स्थानकवासी जैन संघाने पुढाकार घेतला आणि त्या माध्यमातून अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देता आले. आतापर्यंत केंद्रातील नऊ शाळेतील विद्यार्थ्यांना लाभ झालेला आहे. त्या शाळांनी स्थानक संघाला आभारपत्र पाठविले.

या शैक्षणिक वर्षी या आदिवासी भागातील गरीब विद्यार्थ्यांसाठी शालेय साहित्य द्यावयाचे असून ज्यांच्याकडे नोटबुक, स्टोरी बुक्स, सर्व स्टेशनरी, पेन्सिल पेन, रबर , राइटिंग पॅड, स्लेट, स्कूल बॅग, सॅग, वॉटर बॅग, वॉटर बॉटल, कॅप, पुस्तके, कव्हर रोल, रंग, ब्रश, अभ्यास सारणी इ.असे जुने अथवा नवे शालेय साहित्य असेल त्यांनी श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघात चौधरी यांच्याशी संपर्क साधावा. या कार्यासाठी श्रीरामपूर स्थानकवासी जैन संघाचे अध्यक्ष रमेश लोढा, कल्याण कुंकुलोळ, महावीर राका, बाळासाहेब खाबिया,यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे. तसेच याबाबत अधिक माहितीसाठी पंकज हिरण व प्रशांत कोठारी यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कोल्हापूरात रंगणार महाराष्ट्र पत्रकार संघाचे २१ वे महाधिवेशन


## दिग्गज मान्यवरांच्या हस्ते वितरण

**कोल्हापूर । रावसाहेब राशिनकर**

महाराष्ट्र पत्रकार संघाचे २१वे महाधिवेशन तथा वर्धापन दिन सोहळा रविवार ता. १ जून २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता राज्यभरातील दिग्गज मान्यवर व तमाम पत्रकारांच्या उपस्थितीत कोल्हापूर जिल्ह्यातील संजय घोडावत युनिव्हर्सिटीत अतिग्रे येथे आयोजित करण्यात आला आहे सदर सोहळ्यासाठी राज्यभरातील शेकडो इलेक्ट्रॉनिक व प्रिंट मिडियाचे पत्रकार व दिग्गज मान्यवर सदर महाअधिवेशनास उपस्थित राहणार आहेत.

या अधिवेशनाच्या निमित्ताने ज्येष्ठ पत्रकार किरण सोनवणे हे ''पत्रकारितेसमोरील आव्हाने व विश्वासार्हता''या विषयावर राज्यभरातील तमाम पत्रकारांना विशेष मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी पत्रकारिते संदर्भात विविध विषयावरील खुल्या चर्चा सत्राचे आयोजन महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे त्याचबरोबर या महाअधिवेशनात पत्रकारांच्या विविध समस्या संदर्भातील ठराव पारित करून शासनास सादर करण्यात येणार आहेत.या अधिवेशनाचे औचित्य साधून महाराष्ट्र पत्रकार संघाच्या वतीने राज्यभरातील शैक्षणिक,सामाजिक, राजकीय,सांस्कृतिक,कला,क्रीडा,उद्योग,चित्रपट,सहकार,पत्रकारिता, वैद्यकीय अशा विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती व संस्थांना राष्ट्रीय नवरत्न पुरस्कार देऊन मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. तरी राज्यभरातील तमाम पत्रकारांनी व हितचिंतकानी या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे व सोहळा यशस्वी करण्याचे आवाहन राज्याध्यक्ष विलासराव कोळेकर, उपाध्यक्ष सागर पाटील, राज्य संपर्क प्रमुख बाबासाहेब राशिनकर, सचिव शेखर सूर्यवंशी, प्रमुख संघटक शिरीष कुलकर्णी,यजमान संयोजक कोल्हापूर जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष अनिल उपाध्ये, राज्य कार्यकारिणी सदस्य राजकुमार चौघुले,सुनील कांबळे, संजय सुतार,रमेश बोभाटे,दीपक पोतदार, बाबासाहेब नेर्ले, प्रा. रावसाहेब राशिनकर, अ‍ॅड. प्रकाश साळसिंगीकर, सर्व जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी यांनी केले आहे.

नोंदणी क्रं. महा ९५८७
महाराष्ट्र पत्रकार संघ

शिवराजाभिषेक दिन व वर्धापन दिनानिमित्त

रयत कृतज्ञता गौरव सोहळा



ज्येष्ठ पत्रकार कामिल पारखे यांचा सन्मान
हस्ते ह.भ.प. श्यामसुंदर महाराज सोन्नर



कार्यक्रम अध्यक्ष
डॉ. सुरेश पठारे

प्रमुख पाहुणे
सुभाष गुंदेचा

कोमल नारायण वाकळे
(शिवछत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडू)

शुक्रवार, ता.६ जून २०२५ रोजी
सकाळी ११ वाजता.
ठिकाण : पत्रकार भवन सभागृह,
पत्रकार चौक, मनमाड रोड,
अहिल्यानगर (अहमदनगर)

परिसंवाद - माध्यमे आणि अखंड भारत
राष्ट्रीय एकात्मतेची भुमिका

विनित

भैरवनाथ वाकळे, असिफखान दुलेखान, राजेंद्र देवढे, प्रभाकर ढगे, श्रीकांत काकतीकर, दिपक शिरसाठ, मोहसिन शेख, संध्या मेढे, मरयम सय्यद, आबिदखान, संतोष गायकवाड, पंकज गुंदेचा, तुषार सोनवणे, समी सय्यद, विजय केदारे, दत्ता वडवणीकर, अतुल देठे, दिगंबर भोसले